# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/registrar@unigug.ac.in

जा.क्र. /गोंविग/कुसका/ ५३८/२०२५ दि. १६/०१/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय** :- आपल्या महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक विद्यार्थी यांना कार्यशाळेत सहभागी करण्याबाबत.

**संदर्भ** :- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे पत्र क्र. विनिमं-२०२५/म.भा.पं./०२, दिनांक ०१/०१/२०२५ नुसार.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिनांक १४ ते २८ जानेवारी, २०२५ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्य बुधवार दिनांक २२ जानेवारी, २०२५ सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विश्वकोश आणि कुमार विश्वकोश परिचय कार्यशाळा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे विद्यापीठाच्या जुन्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

विश्वकोशातील अद्ययावत माहिती आणि यातील संशोधन जिज्ञासू वाचकापर्यंत पोहोचविणे, तज्ज्ञांना लेखन कार्यात सहभागी करुन घेणे, तसेच मराठी भाषा विभागांतर्गत असलेल्या विश्वकोशाच्या उपक्रमांची माहिती करुन देणे या उद्देशाने विद्यापीठांतर्गत असलेल्या विज्ञान-तंत्रज्ञान, कला व वाणिज्य आदी विभागातील संशोधक विद्यार्थी, अभ्यासक व प्राध्यापक यांच्यासाठी सदर कार्यशाळेतील विविध सत्रांमध्ये तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. करिता आपल्या महाविद्यालयांतर्गत येणाऱ्या विविध विभागातील प्राध्यापक अभ्यासक व संशोधक विद्यार्थी यांना सदर कार्यशाळेचा लाभ घेण्यासाठी **दिनांक २० जानेवारी, २०२५ सायंकाळी ५.३० पर्यंत** नोंदणी करुन नियोजित वेळेनुसार कार्यशाळेकरिता पाठवावे.

**टिप :- कार्यशाळेची नोंदणी करण्याकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

**धन्यवाद !**

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

प्रतिलीपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

आणि

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

यांच्या संयुक्त विद्यमाने

**दि. १४ - २८ जानेवारी - मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त**

बुधवार, **दिनांक** : २२ जानेवारी २०२५, वेळ : स १०.३० वा.

# "मराठी विश्वकोश आणि कुमार विश्वकोश परिचय कार्यशाळा"

## कार्यक्रम पत्रिका

| वेळ | कार्यशाळा रूपरेषा |
|---|---|
| १०.३० - ११.०० | नावनोंदणी व चहापान |
| ११.०० - ११.४५ | **उद्घाटन सत्र**<br>उद्घाटक : मा. डॉ. प्रशान्त बोकारे<br>कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली<br>अध्यक्ष : मा. डॉ. रवींद्र केशवराव शोभणे<br>अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ<br>प्रमुख उपस्थिती : मा. डॉ. श्रीराम कावळे<br>प्र.कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली<br>प्रमुख उपस्थिती : मा. डॉ. अनिल हिरेखण<br>कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली<br>सूत्रसंचालन : डॉ. शिल्पा आठवले,<br>पदव्युत्तर शैक्षणिक इंग्रजी विभाग<br>आभार प्रदर्शन : डॉ. अनिरुद्ध गचके,<br>पदव्युत्तर शैक्षणिक वाणिज्य विभाग |
| **सत्र : १** | |
| ११.४५ - १२.३० | अभिजात मराठी आणि मराठी विश्वकोश नोंदींचे महत्त्व<br>- **डॉ. गजानन कोर्तलवार,**<br>सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव, ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर |
| **सत्र : २** | |
| १२.३० - ०१.१५ | मराठी विश्वकोश आणि लेखनसंहिता<br>- **सरोजकुमार मिठारी**<br>विद्याव्यासंगी सहायक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ |
| ०१.१५ - ०२.३० | **भोजन** |
| **सत्र : ३** | |
| ०२.३० - ०३.१५ | कुमार विश्वकोश आणि विज्ञानविषयक कोशीय लेखन<br>- **डॉ. स्नेहा दिलीप खोब्रागडे**<br>विद्याव्यासंगी सहायक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ |
| ०३.१५ - ०४.०० | खुली चर्चा व प्रशिक्षणार्थींचे मनोगत<br>सूत्रनिवेदन : **डॉ. सविता गोविंदवार**<br>पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| ०४.०० | **समारोप सत्र**<br>प्रमुख उपस्थिती : मा. डॉ. श्रीराम कावळे<br>प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |

| | |
|---|---|
| | मा. डॉ. अनिल हिरेखण<br>कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली<br>मा. डॉ. श्याम खंडारे<br>अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली<br>सूत्रसंचालन : प्रा. अमोल चव्हाण<br>पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग<br><br>आभार प्रदर्शन : डॉ. धैर्यशील खामकर<br>पदव्युतर शैक्षणिक उपयोजित अर्थशास्त्र विभाग |

स्थळ – जुन्या प्रशासकीय इमारतीचे सभागृह, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली